**Dr. Ravasaheb Kerappa Shelake**
**Associate Professor**
**Acharya Jawadekar College of Education, Gargoti**
**Mob-8275459230**
**E mail ID-drrrkshelake@gmail.com**

## Published Papers List 2017-2018

**I) Published Papers in Refereed Journals as notified by the UGC**

| Sr. No | Title with Page Nos. | Journal | ISSN ISBN No. | Impact Factor If any | Whether principal author/ corresponding author / Guide |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या बी . एड.अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासितेसबंधी पाठ्याक्रमाच्या एन शालेय आराखडा आणि .ई.टी.सी. आंतरवासिता मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास<br>पृष्ठ क्र.१७४ ते १७९ | Aayushi International Interdisciplinary Research Journal UGC Approved No. 64259 | ISSN-2349-638X | 3.025 | Principal |
| 2 | महिला सक्षमीकरणामध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका<br>Page No.230 to 232 | Aayushi International Interdisciplinary Research Journal UGC Approved No. 64259 | ISSN-2349-638X | 3.025 | Principal |

**II) Approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC.**

| Sr. No. | Title with page nos. | Type of &Authorship | Publisher & ISSN/ ISBN No. | Whether peer reviewed | No. of co-authors | Whether principal author /corresponding author /Guide |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दोन वर्षीय बी.एड. अभ्यासक्रमातील 'शालेय आंतरवासिता' प्रात्यक्षिकाच्या नियोजन व अंमलबजावणी संबंधी प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास Page.No.20 to 23 | corresponding author | मल्हार पब्लिकेशन, पुणे<br>ISBN 978-81-924108-9-0 | No | -- | corresponding author |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | शिक्षक शिक्षणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या अंमलबजवणीमध्ये शिक्षक प्रशिक्षकाची भूमिका Page.No. 164 to 166 | corresponding author | ISBN 978-93-84801-07-6 | No | --- | corresponding author |
| 3 | ICT चे चिकित्सक आकलन या EPC च्या अमलबजवणीचा अभ्यास Page.No. 176 to 178 | corresponding author | ISBN 978-93-83796-46-5 | | | corresponding author |

**III) Subject Books, published by National level publishers, with ISBN/ISSN number or State / Central Govt. Publications as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC.**

| Sr. No. | Title with page nos. | Type of Book & Authorship | Publisher & ISSN/ ISBN No. | Whether Peer reviewed | No. of co-authors | Whether principal author /corresponding author /Guide |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता सातवी इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक | क्रमिक पाठ्य पुस्तक | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व | नाही | आहेत | corresponding author |
| २ | इयत्ता नववी इतिहास व राज्यशास्त्र पाठ्यपुस्तक | क्रमिक पाठ्य पुस्तक | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व | नाही | आहेत | corresponding author |
| 3 | ग्रानिक इतिहास लेखन एक नवोपक्रम | सहसंपादक | श्री मौनी विद्यापीठ ,गारगोटीचे मुखपत्र 'ग्रामीण शिक्षण' मौनी उत्सव २६ फेब्रुवारी,२०१७ | नाही | आहेत | corresponding author |

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION GARGOTI.

PRINCIPAL
Acharya Jawadekar College of Education
Gargoti. Dist. Kolhapur

ISSN -2349-638x
Impact Factor 3.025
UGC Approved No.64259



Rayat Shikshan Sanstha's

# Swami Sahajanand Bharati College of Education, Shrirampur

NAAC Re-accredited "A" Grade

# Two Day National Annual Conference

In Association with

**Maharashtra State Secondary Teacher Educators' Association (MSSTEA)**

16 th & 17 th Dec.2017




## Aayushi International Interdisciplinary Research Journal

Special Issue- XVII

On

**"Assessment And Accreditation of Teacher Education Institutes "**

**Editor**

Mr.Bhagwat Asaram Shinde
Assistant Professor,
Swami Sahajanand Bharati College of Education,
Shrirampur,Dist. Ahmednagar 413709 (M.S.)



Rayat Shikshan Sanstha's

**Swami Sahajanand Bharati College of Education, Shrirampur,Dist. Ahmednagar**

# Two day National Annual Conference

**On**

## Assessment & Accreditation of Teacher Education Institutes

**On**

**16th & 17th December 2017**

**In Association with**

**Maharashtra State Secondary Teacher Educator's Association (MSSTEA)**

**A Special issue of**

## Aayushi International Interdisciplinary Research Journal

**Special Issue- XVII ISSN –2349-638x**

**Impact Factor 3.025**

Editor

**Mr.Bhagwat Asaram Shinde**

Assistant Professor,

Swami Sahajanand Bharati College of Education,

Shrirampur,Dist. Ahmednagar 413709 (M.S.)

# PUBLICATION DETAILS

| | |
|---|---|
| **Title** | **Assessment & Accreditation of Teacher Education Institutes** |
| **Editor** | **Prof. Bhagwat Asaram Shinde** |
| **Editorial Board** | **Dr. M.S. Pondhe** Prin. S.S.B. College of Education, Shrirampur<br>**Dr. R.K. Nannar** Asso. Prof. S.S.B. College of Education, Shrirampur<br>**Prof. A.K. Karwar** Asst. Prof. S.S.B. College of Education, Shrirampur<br>**Prof. V.S. Patole** Asst. Prof. S.S.B. College of Education, Shrirampur<br>**Prof. C.M. Bhoye** Asst. Prof. S.S.B. College of Education, Shrirampur<br>**Prof. N.H. Mengal** Librarian, S.S.B. College of Education, Shrirampur |
| **Publisher** | **Aayushi International Interdisciplinary Research Journal**<br>**Impact Factor 3.025** **UGC Approved No.64259** |
| **ISSN No.** | **2349-638x** |
| **Edition** | Published in December 2017 |
| **Disclaimer** | • We do not warrant the accuracy or completeness of the information, text, graphics, links or other items contained within these articles.<br>• We accept no liability for any loss, damage or inconvenience caused as a result of reliance on such content.<br>• Only the author is the authority for the subjective content and may be contacted.<br>• Any specific advice or reply to query on any content is the personal opinion of the author and is not necessarily subscribed to by anyone else. |
| © | All rights are reserved |
| **Warning** | • No part of this publication may be reproduced, reprinted, translated and stored in the retrieval system, transmitted or utilized in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author.<br>• All disputes are subjected to Ahmednagar Jurisdiction only. |

| | | | |
|---|---|---|---|
| 38. | डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई | बी.एड्. छात्राध्यापकांच्या समाजभिमुख प्रकल्पांतर्गत मूल्यमापनासाठीच्या साधनांचे विकसन | 146 To 153 |
| 39. | डॉ. महादेव सदाशिव डिसले | शिक्षक शिक्षण कार्यक्रमांतर्गत तंत्रस्नेही शिक्षक बनविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास | 154 To 158 |
| 40 | भागवत असाराम शिंदे | शैक्षणिक चित्रपटातून छात्राध्यापकातील शिक्षक उत्तरदायित्व संवर्धन : एक प्रयोग | 159 To 162 |
| 41. | डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे | इयत्ता ९ वीच्या भूगोल विषयातील ज्ञानरचनावादी अध्यापन कार्यनीतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास | 163 To 173 |
| 42. | डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके | महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिसंबंधी पाठ्यक्रमाच्या एन.सी.टी.ई शालेय आंतरवासिता आराखडा आणि मार्गदर्शक तत्वांच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास | 174 To 179 |
| 43. | डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे | नॅक मूल्यांकन व मूल्यनिर्धारणाची सुधारीत प्रक्रिया आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ | 180 To 182 |
| 44. | कैलास पाडुरंग माळी | दोन वर्ष बी.एड् शिक्षक प्रशिक्षणातील समस्या | 183 To 185 |
| 45. | डॉ.रविराज अच्युत फुरडे | किशोरावस्था के छात्रों में बढता तनाव—एक समस्या | 186 To 187 |
| 46. | **डॉ. शर्मिला भाऊसाहेब पारधे** | **सहायक सामग्री के रूप में इलैक्ट्रॉनिक उपकरण** | 188 To 192 |
| 47. | अरविंद टेके | दोन वर्षाच्या बी.एड. अभ्यासक्रम राबवताना येणाऱ्या समस्या | 193 To 194 |
| 48. | भागवत असाराम शिंदे | बालकुमार दिवाळी अंकातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्काराची रूजवणूक : एक नवोपक्रम | 195 To 200 |
| 49. | **चंद्रकांत एम. भोये** | **शिक्षणशास्त्र पदवी स्तरावरील दोन वर्षीय शिक्षक प्रशिक्षणाचे परिणाम** | 201 To 202 |
| 50. | नागेराव संभाजी भुरके | अभ्यासेत्तर उपक्रमांच्या माध्यमातून समाजशास्त्राचे अध्यापन | 203 To 205 |
| 51. | डॉ. विजय रेवजे | मराठी विषय अध्यापनात व्याख्यान पध्दती व संगणकाचा वापर | 206 To 207 |
| 52. | **डॉ.व्ही.बी.किडगांवकर** | **सोलापूर विद्यापीठ, सोलापूर दोन वर्षाचा बी.एड. अभ्यासक्रम राबविताना आलेल्या अनुभवांचे विश्लेषण** | 208 To 212 |
| 53. | ए.के.करवर, व डॉ.व्ही.के.बामने | महाविद्यालयीन नाविन्यपूर्ण उपक्रम : एक अभ्यास | 213 To 218 |
| 54. | सुनिता मारुती जोगदनकर | इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनात व्याख्यान पध्दती आणि Problem Based Learning पध्दतीच्या अध्यापनाच्या परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास. | 219 To 221 |
| 55. | ए.के. करवर | महाविद्यालयीन यषाचे गमक : नाविन्यपूर्ण उपक्रम | 222 To 224 |
| 56. | **ज्योती दिपक कुलकर्णी** | **शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या सुक्ष्म अध्यापन कौशल्यांच्या मुल्यमापनात व्हि.डी.ओ. वापराच्या परिणामकारकतेचा अभ्यास** | 225 To 227 |

# महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिसंबंधी पाठ्यक्रमाच्या एन.सी.टी.ई शालेय आंतरवासिता आराखडा आणि मार्गदर्शक तत्वांच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके**
सहाय्यक प्राध्यापक
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
*गारगोटी ता. भुदरगड जि.कोल्हापूर*

***सारांश***

*बी.एड अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यामधून समृद्ध व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेले, विविध कौशल्ये आत्मसात केलेले प्रशिक्षणार्थी तयार व्हावेत ही अपेक्षा आहे. मात्र एकवर्षीय बी.एड अभ्यासक्रमाचा कालावधी हा त्यासाठी अपुरा असल्याने तो अभ्यासक्रम दोन वर्षाचा करावा अशी शिफारस कोठारी आयोगाने १९६६ मध्ये केली होती मात्र वर्मा आयोगाच्या शिफारशी नुसार बी.एड अभ्यासक्रम दोन वर्षाचा २०१५-१६ पासून झाला आहे.*

*या दोन वर्षीय बी.एड अभ्यासक्रमात एन.सी.टी.ई २०१४ च्या रेग्यलेशन नुसार अनेक नाविण्यपुर्ण बदल सूचविले आहेत मात्र यामध्ये शालेय आंतरवासिता यासंबंधीचा समावेश कालावधीच्या व त्या अनुषंगाने करावयाच्या विविध कार्यांचा समावेश केला आहे. इतर सर्व व्यावसायिक अभ्यासकमात आंतरवासितेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तसेच बी.एड. या व्यावसायिक अभ्यासक्रमात शालेय आंतरवासिता अत्यंत महत्वाचा घटक आहे. एन.सी.टी.ई.ने जानेवारी २०१६ मध्ये शालेय आंतरराष्ट्रीय आराखडा व मार्गदर्शन तत्वे प्रसिद्ध केली आहे. आहेत. या हा आराखडा व मार्गदर्शन तत्त्वे विचारात घेऊन महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी दोन वर्षीय बी.एड अभ्यासक्रमात समाविष्ठ असलेल्या शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकांचा चिकित्सक अभ्यास संशोधन पेपरमध्ये केला आहे.*

**कळीचे शब्द** (Key word) - शालेय आंतरवासिता विद्यार्थी शिक्षक, एन.सी.टी.ई, लॅब स्कूल, मेन्टर टिचर इत्यादी .

**संशोधनाची गरज व महत्त्व -**

एन.सी.टी. ई.ने प्रसिद्ध केलेला शालेय आंतरवासिता आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे यांचा विचार करता महाराष्ट्रातील विद्यापीठांनी विकसित केलेला दोन वर्षीय बी.एड. अभ्यासक्रम व त्यामधील शालेय आंतरवासिता या प्रात्याक्षिकासंबंधी दिलेली माहिती यामध्ये गुणांचा भारांश, कालावधी, श्रेयांक भारांश, अंतर्गत मूल्यमापनाचे गुण, पाठांची संख्या, मूल्यमापन योजना इत्यादी संबंधीची तुलनात्मक माहिती अभ्यासली आहे. त्यामुळे एन.सी.टी.ई च्या अपेक्षा यानुसार शालेय आंतरवासिता यासंबंधीची सद्दस्थिती लक्षात येणार आहे. तसेच विद्यापीठ निहाय वर नमुदकेलेल्या मुद्दांमध्ये असणारी भिन्नता समजण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे. यामधील निष्कर्ष बी.एड अभ्यासक्रम सुधारीत करणा-या तज्ज्ञांना उपयुक्त ठरणार आहेत. तसेच शालेय आंतरवासितेच्या अभ्यासकांना प्रस्तुत संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता व मार्गदर्शन तत्त्वाचा अभ्यास करणे.
२) एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता व मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासितेसंबंधी पाठ्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास करणे.

**संधोधनाची व्याप्ती-**

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांच्या (अकृषी) बी.एड. अभ्यासक्रमाला लागू पडतात.

**संशोधनाची परिमर्यादा**

१) प्रस्तुत संशोधन एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता :आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे (जानेवारी, २०१६) पुरते मर्यादीत आहे.
२) प्रस्तुत संशोधन महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांनी त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकापुरते मर्यादीत आहे.

**ISSN 2349-638x Impact Factor 3.025**

### संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रराज्यातील विविध विद्यापीठांच्या विद्यमान दोन वर्षीय बी.एड. अभ्यासक्रमाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वेक्षण संशोधन पद्धतीने संशोधन केले आहे.

### नमुना निवड-

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील सर्व पारंपरिक अकृषी विद्यापीठांची निवड सहेतुक नमुना निवडीने केली आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता या पाठ्यक्रमाची चिकित्सक अभ्यासासाठी निवड केली आहे.

### संशोधन साधन

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील पारंपरिक अकृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या बी.एड अभ्यासक्रमाच्या कागदपत्रांचा (pdf document) या चिकित्सक अभ्यासासाठी उपयोग केला आहे.

### संख्याशास्त्रीय विश्लेषण

एन. सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता : आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे यानुसार महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांनी विकसीत केलेल्या बी.एड अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता पाठ्यक्रमाच्या अभ्यासासाठी तक्त्याव्दारे विश्लेषण केले आहे.

**सारणी क्रमांक. १**

**एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे यानुसार महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंरवासिता पाठ्यक्रमाचे विश्लेषण**

| विद्यापीठाचे नांव | सत्र/वर्ष | एकूण तासिका | श्रेयांक | अंतर्गत मूल्यमापन | शाळा निवड उल्लेख | | संपर्क (गुरु) शिक्षक उल्लेख | एकूण कोर्स श्रेयांक | एकूण श्रेयांक शेकडा भारांश | एकूण कोर्स गुण | आंतरवासिता शेकडा भारांश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शासकीय ८०% | खाजगी २०% | | | | | |
| सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सत्र - I | १०० | ०२ | ५० | आहे | आहे | नाही | ९६ | २०.८३% | २४०० | १८.७५ % |
| | सत्र - II | २०० | ०४ | १०० | | | | | | | |
| | सत्र - III | ४०० | १० | २५० | | | | | | | |
| | सत्र - IV | १०० | ०२ | ५० | | | | | | | |
| | एकूण | **८००** | **२०** | **४५०** | | | | | | | |
| संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती | सत्र - II | ९० | ०३ | ७५ | नाही | नाही | नाही | ८८ | १८.८८% | २२०० | १८.१८ % |
| | सत्र - III | ३०० | १० | २५० | | | | | | | |
| | सत्र - IV | ९० | ०३ | ७५ | | | | | | | |
| | एकूण | **४८०** | **१६** | **४००** | | | | | | | |
| शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सत्र - II | १०८ | ०४ | १०० | नाही | नाही | आहे | ९६ | १७.७०% | २४०० | १७.७० % |
| | सत्र - III | ३९६ | १३ | ३२५ | | | | | | | |
| | एकूण | **५०४** | **१७** | **४२५** | | | | | | | |
| सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे | प्रथम वर्ष | ६४ | ०४ | १०० | नाही | नाही | नाही | ८० | १७.५०% | २००० | १७.५ % |
| | व्दितीय वर्ष | १६० | १० | २५० | | | | | | | |
| | एकूण | **२२४** | **१४** | **३२५** | | | | | | | |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर | सत्र - II | १८० | ०४ | १०० | नाही | नाही | नाही | ८० | १५.००% | २१०० | १९.९० % |
| | सत्र - III | ३६० | ०८ | १५० | | | | | | | |
| | एकूण | **५४०** | **१२** | **२५०** | | | | | | | |
| स्वामी रामानंद | प्रथम वर्ष | ९६ | ०३ | ७५ | नाही | नाही | नाही | ८८ | १२.५% | २२०० | १२.५० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** | द्वितीय वर्ष | २५६ | ०८ | २५० | | | | | | | % |
| | एकूण | **३५२** | **११** | **३२५** | | | | | | | |
| **मुंबई विद्यापीठ, मुंबई** | सत्र - I | १०८ | ३० | १०० | नाही | नाही | नाही | १११ | २७.०२% | १८०० | २५.०० % |
| | सत्र - II | ३९६ | | २०० | | | | | | | |
| | सत्र - III | १८० | | १५० | | | | | | | |
| | एकूण | **८६४** | **३०** | **४५०** | | | | | | | |
| **एस.एन. डी.टी. विद्यापीठ, मुंबई** | सत्र - II | १८० | ०६ | १५० | नाही | नाही | नाही | ८० | २०% | २००० | २०.०० % |
| | सत्र - III | १८० | ०६ | १५० | | | | | | | |
| | सत्र - IV | १२० | ०४ | १०० | | | | | | | |
| | एकूण | **४८०** | **१६** | **४००** | | | | | | | |
| **डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद मराठवाडा** | प्रथम वर्ष | १२० | ०४ | १०० | नाही | नाही | नाही | १०३ | ११.६५% | २५०० | १२.०० % |
| | द्वितीय वर्ष | ५२८ | ०८ | २०० | | | | | | | |
| | एकूण | **६४८** | **१२** | **३००** | | | | | | | |
| **गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** | सत्र - II | १८० | ०४ | १०० | नाही | नाही | नाही | ८० | १५% | २००० | १२% |
| | सत्र - III | ३६० | ०८ | १५० | | | | | | | |
| | एकूण | **५४०** | **१२** | **२५०** | | | | | | | |
| **उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगांव** | सत्र - III | ५६० | ०८ | २५० | नाही | नाही | नाही | १०० | ८.००% | २५५० | ९.८०% |
| **एकूण** | | **३८००** | **१६८** | **६१६०** | | | | **१००२** | **१८४.०८** | **२४१५०** | **१७५.८३** |
| **एकूण सरासरी** | | **३४५** | **१५.२७** | **५६०** | | | | **९१.०९** | **१६.७३** | **२१९५** | **१५.९८** |

**निरीक्षण -**

१) वरील सारणी क्रमांक. १ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, मुंबई विद्यापीठाने महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेत बी.एड अभ्यासक्रमातील शालेय ,आंतरवासितेसाठी सर्वाधिक भारांश श्रेयांक व गुण दिले आहेत त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे २७.०२% व २५.००% इतके आहे. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगांव यांच्या बी.एड अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेतशालेय आंतरवासितेसाठी सर्वात कमी श्रेयांक भारांश व गुणांच्या भारांशाचे शेकडा प्रमाण कमी असून ते अनुक्रमे ८.००% व ९.८०% इतके आहे.

२) महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासितेसाठी श्रेयांक व गुणांचा भारांश सरासरी अनुक्रमे १६.७३% व १५.९८% इतका दिसुन येतो.

३) महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठामधील face to face mode बी.एड. अभ्यासक्रम या चालविणा-या ७२.७३% विद्यापीठांमध्ये सत्र पद्धतीने बी.एड कोर्सची अंमलबजावणी केली जात आहे. तर २७.२७% इतक्या विद्यापीठामध्ये वार्षिक पद्धतीने बीएड. कोर्सची अंमलबजावणी सुरु आहे.

४) महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात सरासरी ५२८ तासिका ह्या शालेय आंतरवासितेसाठी दिल्या आहेत.

५) महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमातील आंतरवासितेच्या मूल्यमापनासाठी अंतर्गत मूल्यमापन ही पद्धती स्वीकारली आहे.

६) महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठांच्या बी. एड अभ्यास क्रमात बी.एड प्रथम / व्दितीय वर्ष अथवा सत्र १ ते ४ या कालावधीत १८+२ अथवा २० आठवड्याच्या शालेय आंतरवासिते समावेश केला आहे.
७) केवळ ९.०९% इतक्या विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात शालेय आंतरवासितेसाठी शाळा निवडताना शासकीय शाळा ८०% व खाजगी शाळा २०% निवडण्यासंबंधीचा उल्लेख केला आहे. तसेच Mentor/contact Teacher च्या संदर्भातील उल्लेख ही केवळ ९.०९% विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात केलेला आहे.
८) एकाही विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमात शालेय आंतरवासिता विद्यार्थी शिक्षकांच्या मूल्यमापनात संपर्क (गुरु) शिक्षक व शाळेचे मुख्याध्यापक यांचा सहभाग घेतलेला दिसून येत नाही.

**निष्कर्ष-**

**उद्दिष्ट्य क्रमांक. १** एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता व मार्गदर्शन तत्त्वाचा अभ्यास करणे.

एन.सी.टी.ई. ने शालेय आंतरवासिता आराखडा व मार्गदर्शन तत्त्वांमध्ये बी.एड. अभ्यासक्रमात शालेय आंतरवासितेचा कालावधी गुणांचा श्रेयांकाचा भारांश खालीलप्रमाणे

१) बी.एड.प्रथम वर्षांध्ये (सत्र २) एकूण ४० श्रेयांकापैकी ०४ श्रेयांक, एकूण १००० गुणांपैकी १०० गुण हे शालेय आंतर वासिनेसाठी दिलेले आहेत त्यांचे एकूण श्रेयांक व एकूण गुणांच्या संदर्भात भारांश १०% इतका आहे. (२ आठवडे कालावधी)
२) बी.एड व्दितीय वर्षांमध्ये (सत्र -३) एकूण ४० श्रेयांकापैकी १६ (१४+२) श्रेयांक, एकूण १००० गुणांपैकी ४०० गुण हे शालेय आंतरवासितेसाठी दिलेले आहेत. एकूण श्रेयांक व गुणांपैकी ४०% भारांश शालेय आंतरवासितेसाठी दिला आहे. (सत्र ३ मध्ये १६ आठवडे कालावधी)
३) शालेय आंतरवासितेसाठी ८०% शासकीय व २०% खाजगी शाळांची निवड करावी.
४) केंद्र स्तर, राज्य स्तर, संलग्नन संस्था, शिक्षणशास्त्र महाविद्यालये व आंतरवासिता शाळा (यजमान शाळा) यांनी भविष्यातील चांगले शिक्षण तयार होण्यासाठी संघटितपणे जबाबदारी पार पाडावी.
५) केंद्र, राज्य शिक्षण मंडळ , संलग्न संस्था, शिक्षणशास्त्र महाविद्यालये, यजमान शाळा व शिक्षक प्रशिक्षणार्थी यांनी पार पाडावयाची विविध कार्ये नमूद केली आहेत .
६) यजमान शालेतील अनुभवी संपर्क शिक्षक व त्या शाळेचे मुख्याध्यापक यांची शालेय आंतरवासिता अंमलबजावणी व मूल्यमापनातील भूमिका व जबाबदा-या महत्वांच्या आहेत हे नमुद केले आहे.
७) शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांची शालेय आंतरवासिता यामधील भुमिका व जबाबदा-या खालील प्रमाणे दिल्या आहेत.
   १) शालेय आंतरवासिता (यजमान) शाळांना शालेय आंतरवासिता हस्तपुस्तिका पुरविणे.
   २) शालेय आंतरवासिता शाळेचे मुख्याध्यापक/ प्राचार्य व संपर्क (गुरु) शिक्षक यांच्यासाठी उद्‌बोधन बैठकीचे आयोजन करणे.
   ३) शालेय संपर्क (गुरु) शिक्षकाच्या सहकार्याने वाढीव कृतींसाठी पुरवणी साहित्याचे विकसन करणे.
   ४) पंधरा दिवसातून एकदा संपर्क (गुरु) शिक्षकाबरोबर आढावा बैठकीचे आयोजन करणे.
   ५) विद्यार्थी- शिक्षकांबरोबर शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये नियमितपणे अनुधावन बैठकीचे आयोजन करणे.(सुट्टीच्या वेळेत)
   ६) आंतरवासितेची अंमलबजावणी बरोबरच सरावपाठांची निरीक्षणे यावर देखरेख ठेवणे.
   ७) विद्यार्थी शिक्षकांच्या कार्यमानाचे मूल्यमापन संपर्क (गुरु) शिक्षकाच्या व शालेय मुख्याध्यापकांच्या सहकार्याने करणे.

८) एन.सी.टी. ई. रेग्युलेशन २०१४ नुसार आंतरवासितेचे १००% अंतर्गत मूल्यमापन करणे. (यामध्ये संपर्क शिक्षक , शालेय मुख्याध्यापक, मार्गदर्शन प्राध्यापक यांनी संयुक्त मूल्यमापन करणे.)

**उद्दिष्ट- २ एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता व मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासितेसंबंधी पाठ्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास करणे.**

१) मुंबई विद्यापीठाने महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेत बी.एड अभ्यासक्रमातील शालेय ,आंतरवासितेसाठी सर्वाधिक भारांश श्रेयांक व गुण दिले आहेत त्यांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे २७.०२% व २५.००% इतके आहे. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ , जळगांव यांच्या बी.एड अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेतशालेय आंतरवासितेसाठी सर्वात

कमी श्रेयांक भारांश व गुणांच्या भारांशाचे शेकडा प्रमाण कमी असून ते अनुक्रमे ८.००% व ९.८०% इतके आहे. (सारणी क्रमांक. १)

२) महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासितेसाठी श्रेयांक व गुणांचा भारांश सरासरी अनुक्रमे १६.७३% व १५.९८% इतका दिसुन येतो. (सारणी क्रमांक. १)

३) महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठामधील face to face mode बी.एड. अभ्यासक्रम या चालविणा-या ७२.७३% विद्यापीठांमध्ये सत्र पद्धतीने बी.एड कोर्सची अंमलबजावणी केली जात आहे. तर २७.२७% इतक्या विद्यापीठामध्ये वार्षिक पद्धतीने बीएड. कोर्सची अंमलबजावणी सुरु आहे. (सारणी क्रमांक. १)

४) महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात सरासरी ५२८ तासिका ह्या शालेय आंतरवासितेसाठी दिल्या आहेत. (सारणी क्रमांक. १)

५) महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमातील आंतरवासितेच्या मूल्यमापनासाठी अंतर्गत मूल्यमापन ही पद्धती स्वीकारली आहे. (सारणी क्रमांक. १)

६) महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठांच्या बी. एड अभ्यास क्रमात बी.एड प्रथम / व्दितीय वर्ष अथवा सत्र १ ते ४ या कालावधीत १८+२ अथवा २० आठवड्याच्या शालेय आंतरवासिते समावेश केला आहे. (सारणी क्रमांक. १)

७) केवळ ९.०९% इतक्या विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात शालेय आंतरवासितेसाठी शाळा निवडताना शासकीय शाळा ८०% व खाजगी शाळा २०% निवडण्यासंबंधीचा उल्लेख केला आहे. तसेच Mentor/contact Teacher च्या संदर्भातील उल्लेख ही केवळ ९.०९% विद्यापीठांच्या बी.एड अभ्यासक्रमात केलेला आहे. (सारणी क्रमांक. १)

८) एकाही विद्यापीठाच्या बी.एड अभ्यासक्रमात शालेय आंतरवासिता विद्यार्थी शिक्षकांच्या मूल्यमापनात संपर्क (गुरु) शिक्षक व शाळेचे मुख्याध्यापक यांचा सहभाग घेतलेला दिसून येत नाही.(सारणी क्रमांक. १)

**शिफारशी -**

१) दोन वर्षीय बी.एड अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता यामध्ये संपर्क व (गुरु) शिक्षकाची भूमिका महत्त्वपुर्ण असल्याने त्यांचा समावेश बी.एड. अभ्यासक्रमात करण्यात यावा

२) शासकीय व खाजगी दोन्ही शाळामध्ये शालेय आंतरवासितेचे आयोजन करण्यात यावे.

३) विद्यार्थी शिक्षकांच्या शालेय आंतरवासिता मूल्यमापनात संपर्क (गुरु) शिक्षक व शालेय मुख्याध्यापक यांचा सहभाग घेण्यात यावा.

४) शालेय आंतरवासिता स्वतंत्र हस्तपुस्तिकांचे विकसन, राज्यशासन , सलग्न संस्था, शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांनी करावे

५) एन. सी.टी. ई.ने प्रसिद्ध केलेल्या शालेय आंतरवासिता आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये नमूद केलेल्या सर्व कृती शालेय आंतरवासिता कालावधीत विद्यार्थी शिक्षकांनी कराव्यात.

६) माध्यमिक शिक्षणाधिकारी , गट शिक्षणाधिकारी यांनी शालेय आंतरवासिका उपक्रमाचे नियोजन, अंलबजावणी यामध्ये योगदान द्यावे. (बैठकिंना उपस्थिती, शालेय आंतरवासिका उपक्रमाची पहाणी व मार्गदर्शन)

**समारोप-**

बदललेल्या बी.एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एन.सी.टी.ई.ने प्रसिद्ध केलेल्या आराखडा व मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे प्रत्येक विद्यापीठांचे या प्रात्याक्षिकांसबंधी आधिकाधिक असमृद्ध असा अभ्यासक्रम आणखी अद्ययावत करावा. राज्यशासन सलग्न संस्था, शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये, लॅब स्कूल यांनी भावी चांगल्या शिक्षक निर्मिती साठी भरीव योगदान देण्याची नितांत गरज आहे. स्थानिक गरजा, परिस्थिती यांचा विचार करता काही बाबींमध्ये फरक निश्चितपणे असणार आहे. पण मुलभूत चौकट बाजूला सारता कामा नये याची दक्षता सर्व संबंधीत घटकांनी घेणे गरजेचे वाटते.

**Bibliography**

1. Dr. Babasaheb Ambedakar Marathawada University, A. (2015). Syllabus of Faculty of Education B.Ed. Two year Degree Course. Aurangabad: Dr. Babasaheb Ambedakar Marathawada University .

Organized By, S.S.B. College Of Education,Shrirampur
In Association with MSSTEA
ISSN 2349-638x
Impact Factor 3.025

2. Gondwana Univarsity, G. (2015). Structure And Syllabus Bachelor of Education. Gadchiroli: Gondwana Univarsity.
3. Mumbai, U. O. (2017). Syllabus For Two Years Bachelor Of Education Programme. Mumbai: University Of Mumbai.
4. North Maharshtara University, J. (2015). Syllabus of faculty of Education , B.Ed. Two Year Degree Course. Jalgaon: North Maharshtara University.
5. Rashtra Sant Tukadoji Maharaj Nagpur University, N. (2015). CBS : Bachelor of Education (B.Ed.) Curriculum. Nagpur: Rashtra Sant Tukadoji Maharaj Nagpur University.
6. S.N.D.T. University, M. (2015). Faculty of Education B.Ed. Two Year Degree Course Semester System . Mumbai: S.N.D.T. University .
7. Sant Gadge Baba Amravati University, A. (. (2015). Bachelor of Education (B.Ed.). Amravati : Sant Gadge Baba Amravati University .
8. Savitribai Phule Pune University, P. (2015). B.Ed. Two Year Programme Choice Based Credit System Annual Pattern. Pune: Savitribai Phule Pune University, Pune.
9. Shivaji University, K. (2015). Two B.Ed. Syllabus Choice based Credit System . Kolhapur: Shivaji University, Kolhapur.
10. Solapur University, S. (2015). Curriculum & Its Framework for the Two Year Degree of Bachelor of Education (B. Ed.) . Solapur: Solapur University.
11. Swami Ramanand Teerth Marathwada University, N. (2015). Bachelor of Education (B.Ed.) Two Years-Annual Pattern Program. Nanded: Swami Ramanand Teerth Marathwada University.

ISSN 2349-63[illegible]
Impact Factor 3.025

# NATIONAL SEMINAR

On

# CHALLENGES BEFORE WOMEN ENTREPRENEURSHIP IN INDIA

Women

Organized by,

D. K. Shinde College of Education Gadhinglaj

Maruti Mal, Kadgaon Road, Gadhinglaj

Website: [illegible]

Phone: [illegible]

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION
GARGOTI.

PRINCIPAL.
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

Chh.Shahu Institute of Business ,Education and Research ,Kolhapur (CSIBER)

# D.K.SHINDE COLLEGE OF EDUCATION

# GADHINGLAJ

## ORGANIZES

ICSSR SPONSERED

# NATIONAL SEMINAR

ON

# CHALLENGES BEFORE WOMEN ENTREPRENEURSHIP IN INDIA

**Date : 14th July 2017**

CHIEF PATRON
Adv.S. D.Shinde
President CSIBER

PATRON
Dr.R.A.Shinde
Secretary & Managing Trustee
CSIBER

CHIEF GUEST
Dr.A.M.Gurav
Coordinator
Centre for skill and Entrepreneurship Development,
Shivaji University kolhapur

KEYNOTE SPEAKER
Dr.Mallikarjun Kankatte
Associate Professor
Basveshwar College of Education
Bidar. Karnataka

(114)

## Index



| No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 48. | डॉ.बिडकर सरिता बाबासाहेब | नारी संघर्श और छिन्नमस्ता | 213 To 215 |
| 49. | डॉ.भोसले माधव मा. | १९८० नंतरच्या कादंबरीतील उद्योगजगतातील स्त्री चित्रण | 216 To 219 |
| 50. | माळी अन्नपूर्णा संजय व साळवे शर्मिला शहाजी | भारतीय स्त्री उद्योजकता -एक प्रवास | 220 To 221 |
| 51. | डॉ.राठोड लाजवंती ईश्वरलाल | महिला स्व-विकासासाठी विविध उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास | 222 To 225 |
| 52. | डॉ.रायकर एस्. एम्. | महिला उद्योजकता विकसनामधील अडसर | 226 To 229 |
| 53. | डॉ.शेळके रावसाहेब केराप्पा | महिला सक्षमीकरणामध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका | 230 To 232 |
| 54. | डॉ.सौ. सावंत विद्या वसंत | भारतातील महिला उद्योजिकासमोरीलसंधी व आव्हाने | 233 To 235 |



PRINCIPAL.
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

# महिला सक्षमीकरणामध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका

डॉ.शेळके रावसाहेब केराप्पा
सहाय्यक प्राध्यापक,आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
गारगोटी, जि.कोल्हापूर

**सारांश -**

*Information Communication Technology (ICT) is diverse set of technological tools and resources to create, disseminate, bring value addition & manage information for communication. ICT is a mixture of computer technology and communication technology.*

*Dr. Sansanwal says ICT means " It can be defined as the use of hardware and software for efficient management of information i.e. storage, retrieval, processing, communicating, diffusing and sharing of information for social, economical and cultural upliftment."*

*२१ वे शतक हे माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जात आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे संपूर्ण जग आज एक 'वैश्विक खेडे' बनले आहे. त्यामुळे ख-या अर्थाने आज प्रत्येकाला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. भारताच्या संदर्भात २०११ च्या जनगणेनुसार १००० पुरुषांच्या मागे ९४० इतके स्त्रियांचे प्रमाण आहे. त्यामुळे पुरुष प्रधान भारतीय संस्कृतीमध्ये भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली तरी स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी प्रयत्न करावे लागतात ही दुर्दैवाची बाब आहे असे म्हणावे लागते. याचा अर्थ असा नव्हे की स्त्रीयांना विकासाची संधी मिळाली नाही असे नाही.तर बहुतांश क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या स्वकर्तृत्वाने ठसा उमटला आहे.अगदीच उदाहरण द्यायचे झाले तर इंदिरा गांधी, सोनिया गांधी, प्रतिभाताई पाटील, मीरा कुमार, सुषमा स्वराज यांनी राजकारणामध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. तर सानिया मिर्झा, सायना नेहवाल, पी.व्ही.सिंधू, ऋचा पुजारी आदी महिलांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तर श्रीमती अनुराधा भट्टाचार्य, सुधा मुर्ती, निता अंबांनी आदींनी उद्योग, नोकरी क्षेत्रामध्ये यशस्वीता संपादन केली आहे. तसेच सुनिता विल्यम्स, आनंदीबाई जोशी, जानकी आमल, कमला सोहोनी, अस्मिता चटर्जी आदी संशोधक/वैज्ञानिक महिलांनी वैज्ञानिक शोधांमध्ये मौलिक योगदान दिले आहे. वरील प्रतिनिधिक उदाहरणांमधून महिलांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख होते. त्यांच्याविषयीचा अभिमान वाढीस लागतो. पण खरा प्रश्न आहे तो महिलांच्या बहुसंख्य समुदायाला जर विकासाची संधी उपलब्ध करुन दिली तर भारत खरोखरच महासत्ता बनण्यासाठी अधिक काळ प्रतिक्षा करण्याची गरज नाही आज माहिती तंत्रज्ञानाच्या वाढलेल्या प्रभावाचा उपयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी कसा करता येईल याचा विचार पुस्तके, संदर्भग्रंथ, ऑनलाईन संदर्भ यांच्या अभ्यासाधारे प्रस्तुत सैदधांतिक चिंतनपर पेपरमध्ये केला आहे.*

**कळीचे शब्द (Key Words) :** माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), महिला सक्षमीकरण

## माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची व्याख्या

ICT is a scientific, technological and engineering discipline and management technique used in handling information, its application and association with social, economic and cultural matters (UNESCO, 2002). ICT stands for Information and Communication Technologies. ICT is a part of our lives for the last few decades affecting our society as well as individual life. ICT which is now broadly used in educational world. Teacher, Student, administrator and every people related to education are popularly used ICT.

माहिती संप्रेषण तंत्रज्ञान म्हणजे समाजाच्या उन्नतीसाठी माहितीची साठवण, निर्मिती, प्रक्रिया करणे तसेच माहितीचे संपादन करणे, माहितीचा पुनर्वापर करणे, माहितीचे प्रसारण करणे आदी बाबींचा समावेश होतो. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी 'डिजिटल इंडिया' ही घोषणा केली आहे. त्यामुळे समाजामध्ये प्रत्येक गोष्टीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान देशाच्या प्रत्येक खेड्यापाड्यापर्यंत पोहचले आहे. याचा वापर महिलांच्या सशक्तीकरणासाठी सहजपणे करता येणे शक्य होत आहे.

## महिला सक्षमीकरणाचा अर्थ

Empowerment refers to the abilility of people to control their own destinies in relation to other people in society (Mason, 2005)

There is no universal definition of women's empowerment as factors such as socio-cultural, geographical, environmental, political and economic, as well as many other aspects of countries and regions, influence it.

Kabeer (1994) offers a definition of empowerment as: the expansion in people's ability to make strategic life choices in a context where this ability was previously denied to them.

**According to the World Bank (2008):**

Empowerment is the process of increasing the capacity of individuals or groups to make choices and to transform those choices into desired actions and outcomes.
So, one definition of women's empowerment could be a process that gives them control of power and resources, and changes women's lives over time through their active participation in that process.

महिला सक्षमीकरणाच्या विविध व्याख्यांवरुन महिलांचे सक्षमीकरण म्हणजे "महिला किंवा महिलांचा समुदाय यांना त्यांच्या क्षमता वापरासाठी संधी देणे, प्रेरित करणे, स्त्रोत उपलब्ध करुन देणे महिलांचे जीवनमान उंचावण्यात त्यांना सहभागी करुन येणे असे म्हणता येईल."

**महिलांच्या सक्षमीकरणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका**

वरील माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या व्याख्या व सक्षमीकरण व महिला सक्षमीकरणांचा अर्थ अभ्यासल्यानंतर महिला सक्षमीकरणात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका काय याचा आढावा खालीलप्रमाणे घेतला आहे.

**१) व्यावसायिक/आर्थिक सक्षमीकरणात आयसीटीची भूमिका -**

आयसीटीमुळे महिलांना व्यावसायिक अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. उदा. Training in the use & design of computer application, Media Communication, Electronic, Print, Visual and audio, Typing, Online marketing, Farming, Trading and crafts production. There are plenniful possibilities for ICTS to improve women's economic activities in the fild of trade, governance, education, health, crafts, employment in formal as well as informal sector. Small business, teleporting, flexi time work. याप्रमाणे काही कामे प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन करायची आहेत तर काही घरबसल्या करायची आहेत. उदाहरणादाखल काही कामांमध्ये आयसीटीचा वापर कसा होतो ते पाहूया.

**(१) लहान व्यवसाय**

आयसीटीच्या सहाय्याने एखादा लहान व्यवसाय सुरु करता येतो. उदाहरणार्थ सौंदर्याप्रसाधनाच्या साधनांची विक्री यासाठी एखादी वेबसाईट विकसित केली व त्याआधारे वस्तूंची माहिती व किंमत ग्राहकाला दिली व त्याची ऑर्डर व पेमेंट ऑनलाईन स्वीकारले तर ग्राहकाच्या मागणीप्रमाणे या वस्तू घरपोच अथवा पोस्टाने, कुरिअरने पोहचवता येतील यामधून आर्थिक उत्पादन मिळवता येईल. Whats app व्दारे अशा व्यवसायांमध्ये इतर अनेक महिलांना सहभागी करुन घेता येईल.

**(२) Out soursing, Teleworking and Teleserviecs**

टेलिवर्किंग व टेलेसर्व्हिस यामध्ये महिलांना काम करण्याची खूप मोठी संधी आहे.सध्या आपण एस.टी.बस स्थानक,मोबाईल कंपन्यांच्या सर्व्हिससेंटर वरुन महिलांचे संभाषण ऐकतो आहोत.हे क्षेत्र ही महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे आहे.

**(३) Data Entry**

संगणकाचा प्रत्येक क्षेत्रात वापर सुरु झाल्याने संगणक साक्षरांना खूप मोठी मागणी आहे.डाटा एन्ट्री करण्यासाठी उदा.सेतू विभाग,विमा,आरोग्य,बँका,कायद्याची ठिकाणे,सर्वेक्षणांची नोंद इत्यादी ठिकाणी खूप मोठ्या प्रमणात काम करण्याची संधी आयसीटीमुळे महिलांना निर्माण झाली आहे.

**(४) स्वयं रोजगार व व्यवसाय निर्मिती**

आयसीटीसीमुळं डाटा एंन्ट्री,सायबर कॅफे,वेब डिझायनर,संगणक अभियंते,डाटा प्रोसेसिंग,डाटा विश्लेषक आणि संगणक ऑपरेटर्स म्हणून महिलांना संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**(५) आरोग्य विषयक माहिती व सुविधा पुरविणे**

मुलांचा जन्म, त्यांचे संगोपन, स्तनपान, समतोल आहार याविषयीची माहिती फोनद्वारे, वेबसाईटद्वारे देणे. समस्यानुसार प्रश्नांना ऑनलाईन उत्तरे देणे इत्यादी कामे करणे यामध्ये काम करण्याची संधी महिलांना उपलब्ध झाली आहे.

**शहरी महिला आणि आयसीटी :** शहरातील आयसीटी शिकलेल्या महिलांना खालील संधी उपलब्ध आहेत.

१) शैक्षणिक व संशोधनाच्या संधी
२) करिअर सुधारण्याच्या संधी
३) फॅशन व त्याचे बाजार मूल्य
४) कला आणि मनोरंजन
५) कार्यकरणा-या महिलांना सामाजिक आधार देणे.
६) न्यायीक हक्क व तरतुदी.

**गरीब पण शहरी भागातील महिला व आयसीटी**

१) मोफत आरोग्य सेवा आणि लहान मुलांचे संगोपन.
२) अल्प मोबदल्यातील खाजगी कामे.
३) निवासाची सोय.
४) मोफत शैक्षणिक सुविधा या शासनाकडून मिळतात.

या क्षेत्रांमध्येही काम करुन महिला सक्षमीकरण करता येणे शक्य आहे. तसे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरु झाले आहेत.

**समारोप**

आयसीटीचा वापर तटस्थपणे करुन महिला सक्षमीकरणाला बळकटी देता येते. आयसीटी वापराचे धोके, फसवणूकीच्या पद्धती याविषयीची जागरुकता करणे सुद्धा गरजेचे आहे. तसेच जाहिरात क्षेत्रामध्ये महिलांचे केले जाणारे किळसवाणे प्रदर्शन इत्यादी धोके विचारात घेऊन जर आयसीटीमुळे निर्माण झालेल्या संधी महिलांना उपलब्ध करुन दिल्या तर निश्चितपणे महिलांच्या क्षमतांचा उपयोग कौटुंबिक, सामाजिक क्षेत्रामध्ये निश्चितपणे होईल. पर्यायाने देशविकासाठी ही त्यांचा उपयोग होईल असे म्हणता येते.

**संदर्भ**

1- चव्हाण, किशोर, महाले संजिवनी, पाटील सुरेश (२००३) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि शैक्षणिक मूल्यमापन. नाशिक :प्रज्ञा प्रकाशन.
2- बागडे, विशाखा (२००७) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान डीटीएड द्वितीय वर्षासाठी पुणे : निराली प्रकाशन.
3- येवले, सीमा (२००४) शैक्षणिक तंत्रविज्ञान व माहिती तंत्रज्ञान. पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
4- बरवे, मीनाक्षी,धारणकर माधवी (२००६) शिक्षणात संगणक आणि माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान.पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
5- Dr.(Mrs.)Adegun Olajire Adeola,Akomolafe Comfort Olufunke.(2002, MARACH 23).Promoting ICT Opportunities For Women Empowerment In Nigeria: Issues And Strategies. Ado-Ekiti, Ado-Ekiti, Nigeria.
6- Dr.Mini Amit Arrawatia, Mr. Pankaj Meel. (2012, October 23).Information and Communication Technologies and. Woman Empowerment in India, International Journal of Advanced Research in Computer Engineering & Technology (IJARCET),India.
7- Sanap,D.M. (2012, April 2). Role of Information and Communication Technology in the Women Empowerment. Pune, Maharashtra, India.
8- SURESH,L. B. (YEAR 2011, VALUME-9, NUMBER 4 23). Impact of Information and Communication Technologies onWomen Empowerment in India. Warangal, Andhra Pradesh -506001, india.

117

# भारतीय शिक्षक - शिक्षण प्रणालीतील बदल




संपादक :

**डॉ. मीना कुटे**

**डॉ. भूपेंद्र बनसोड**

**डॉ. गणेश चव्हाण**



मल्हार पब्लिकेशन, पुणे



ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION
GARGOTI.

PRINCIPAL
Acharya Jawadekar College of Education
Gargoti. Dist. Kolhapur

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1 | मा. कुलगुरू यांचा संदेश | i |
| 2 | परिसंवादाच्या अध्यक्षा यांचा संदेश | ii |
| 3 | मा. अध्यक्ष, मेस्टा यांचा संदेश | iv |
| 4 | प्रास्ताविक | viii |

| अक्र | शीर्षक | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षक शिक्षणातील गुणवत्ता विकास-समस्या व उपाय | डॉ सुग्रीव गोरे | ०१ |
| 2 | शिक्षक प्रशिक्षणात शिक्षकाची बदलती भूमिका | डॉ कविता साळुंखे व ज्योती लष्करी | ०४ |
| 3 | नाविन्यपूर्ण अध्ययन अध्यापन स्त्रोत आणि मुक्त शैक्षणिक संसाधनाची शिक्षक शिक्षणातील उपयुक्तता | डॉ कविता साळुंखे व सचिन पोरे | ०९ |
| 4 | बी.एड अभ्यासकमातील शालेय आंतरवासिता आणि शिक्षक प्रशिक्षणार्थीमधील अध्यापन गुणवत्ता यांच्यापुढील आव्हाने एक अभ्यास | डॉ अनिल तानाजी पाटील | १६ |
| 5 | दोन वर्षीय बी.एड. अभ्यासक्रमातील ' शालेय आंतरवासिता प्रात्यक्षिकाच्या नियोजन व अंमलबजावणी सबंधी प्रशिक्षणार्थीच्या मतांचा अभ्यास | डॉ रावसाहेब शेळके | २० |
| 6 | व्दिवर्षीय बी.एड्. छात्रसेवाकालाची सद्य:स्थिती व आव्हाने एक अभ्यास | डॉ मीना कुटे व प्रियांका सुभेदार | २४ |
| 7 | शिक्षक शिक्षण कार्यकमात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर | डॉ संजय निंबाळकर व मनीषा पाटील | २९ |
| 8 | शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी संस्थाचे सहकार्य व सहभाग | अरविंद टेके | ३३ |
| 9 | शालेय अभ्यासक्रमा पलिकडील भाषा | डॉ मीना मोरे | ३६ |
| 10 | बी.एड. छात्राध्यापकांचा समावेशक शिक्षणासंबंधीचा दृष्टीकोन व अध्यापन कार्यकुशलता: एक अभ्यास | डॉ महेश कोलतमे | ४१ |
| 11 | शिक्षक शिक्षण कार्यक्रमात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग | राकेश रामराजे | ५० |
| 12 | शिक्षण प्रषिक्षपणातील छात्र सेवाकाल कार्यक्रम : परिणामकारकता, आव्हाने आणि उपयुक्तता | प्रतिभा उरसल | ५२ |
| 13 | मुक्त व दूर शिक्षण प्रणालीमध्ये संमंत्रकांना संमंत्रण करण्यासाठी LMS व LCMS या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर | अनिता थोरात व डॉ सज्जन थूल | ५८ |



PRINCIPAL,
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

# दोन वर्षीय बी.एड. अभ्यासक्रमातील ' शालेय आंतरवासिता' प्रात्यक्षिकाच्या नियोजन व अंमलबजावणी सबंधी प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास

प्रा. डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके, सहाय्यक प्राध्यापक
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

एन. सी. टी. ई. ने दोन वर्षीय बी. एड अभ्यासक्रम आराखड्यातील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एकूण 15 आठवड्यांचा किमान कालावधी दिला आहे. म्हणजेच दोन वर्षामधील 400 दिवसांपैकी 90 दिवस शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाला दिले आहेत. त्यामुळे हे प्रात्याक्षिक बी. एड. अभ्यासक्रमातील आत्मा आहे असे म्हटल्यास अतिशोक्ती होणार नाही. या प्रात्याक्षिकाची भारतामधील सर्वच बी. एड. महाविद्यालयांमध्ये सन 2016–17 या शैक्षणिक वर्षात अंमलबजावणी झाली आहे. त्यामुळे संशोधकाने प्रशिक्षणार्थींना शालेय आंतरवासितेचे नियोजन व अंमलबजावणी या संदर्भात काय वाटते? त्यांचे या संदर्भात काय विचार आहेत? त्यांना यामध्ये कोणते बदल सुचवावेसे वाटतात? एकूणच शालेय आंतरवासिता या प्रात्याक्षिकाची प्रभावी अंमलबजावणी करण्यामध्ये या संशोधनाची मदत होईल या हेतूने प्रस्तुत संशोधन विषय हाती घेऊन संशोधन केले आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व**

एक परिपूर्ण शिक्षक होण्यासाठी शालेय आंतरवासिता हे प्रात्यक्षिक अत्यंत महत्त्वाचे आहे त्यामुळे प्रथमच दिर्घ कालावधीच्या शालेय आंतरवासितेची अमंलबजावणी झाली आहे. अंमलबजावणीपूर्वी केलेले नियोजन व त्यानुसार या प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी या अनुषंगाने शिक्षक प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केलेली मते याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन हे अभ्यासक्रम निर्मिती करणारे अभ्यास मंडळ, बी.एड्. महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक प्रशिक्षक यांच्यासाठी गरजेचे व महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1. शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाच्या उद्दिष्ट्याचा अभ्यास करणे.
2. शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात बी. एड. शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास करणे.
3. शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय सूचविणे.

**संशोधनाची गृहितके –**

1. दोन वर्षीय बी. एड. अभ्यासक्रमात शालेय आंतरवासिता हे प्रात्यक्षिक आहे.
2. शालेय आंतरवासिते नंतर शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये या संदर्भात मते व्यक्त करण्याची क्षमता विकसित झाली आहे.

**संशोधनाची व्याप्ती –**

1. दोन वर्षीय बी. एड. अभ्यासक्रमाची कार्यवाही करणाऱ्या सर्व बी. एड. महाविद्यालयांना या संशोधनाचे निष्कर्ष लागू पडतात.

**संशोधनाची परिमर्यादा –**

2. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या बी. एड. अभ्यासक्रमापुरते प्रस्तुत संशोधन मर्यादित आहे.
3. आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष 2016–2017 मध्ये बी. एड. प्रशिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षातील शिक्षक प्रशिक्षणार्थींपुरते प्रस्तुत संशोधन मर्यादित आहे.

4. बी. एड. अभ्यासक्रमातील शालेय आंतरवासिता टप्पा – 2 पुरते प्रस्तुत संशोधन मर्यादित आहे.

**नमुना निवड :–**

प्रस्तुत संशोधनासाठी सशोधकाने सहेतुक नमुना निवड पद्धतीने आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींची नमुना म्हणून निवड केली आहे.

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत संशोधन सर्वेक्षण या संशोधन पद्धतीने केले आहे.

**संशोधन साधन :–**

पस्तुत संशोधनामध्ये सामग्री संकलनासाठी संशोधक निर्मित 'प्रश्नावली' या संशोधन साधनाचा अवलंब केला आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्र :–** शेकडेवारी बरोबरच गुणात्मक पद्धतीने विश्लेषण केले आहे.

**संशोधनाची कार्यवाही –**

'शालेय आंतरवासिता' टप्पा – 2 याची पूर्ण अंमलबजावणी झाल्यावर बी. एड. अभ्यासक्रमात शालेय आंतरवासिता टप्पा – 2 यामध्ये दिलेल्या माहितीस अनुसरून प्रश्नावलीची निर्मिती केली. ती शिक्षक प्रशिक्षणार्थीयाकडून सोडवून घेतली. त्यानंतर तिचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष :–**

**उद्दिष्ट क्र.1.** शालेय आंतरवायिता या प्रात्यक्षिकाच्या उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष :–**

1. बी. एड. अभ्यासक्रमात एकूण 12 उद्दिष्टे दिली असून एन. सी. टी. ई. ने शालेय आंतरवासितेच्या माध्यमातून साध्य करावयाच्या सर्व बाबींना पोषक अशी उद्दिष्टे मांडली आहेत.

**उद्दिष्ट क्र. 2 व 3**

शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात बी. एड.शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या मतांचा अभ्यास करणे.

शालेय आंतरवासिता या प्रात्यक्षिकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय सूचविणे.

निष्कर्ष :–

1) अभ्यासक्रमामध्ये शालेय आंतरवासितेची निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य झाली आहेत असे सर्वच शिक्षक प्रशिक्षणार्थींना वाटते.
2) अभ्यासक्रमामध्ये शालेय आंतरवासितेसाठी दिलेला कालावधी बहुतांश शिक्षक प्रशिक्षणार्थींना पुरेसा वाटतो तरी काही प्रशिक्षणार्थींना आणखी दोन आठवडे कालावधी वाढवावा असे वाटते.
3) शालेय आंतरवासिता कालावधीत नियुक्त करण्यात आलेल्या संपर्क शिक्षकांची संख्या एक ऐवजी दोन असावी असे सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींना वाटते, तसेच 'शालेय संपर्क शिक्षक' हे कृतिशिल वेळोवेळी मार्गदर्शन करणारे असावेत असे शिक्षक प्रशिक्षणार्थींना वाटते.
4) शालेय आंतविासिता कालावधीत आठवड्यातून 2 ऐवजी 4 दिवस शिक्षक प्रशिक्षकानी शाळेत उपस्थित राहावे असे निम्म्याहून अधिक प्रशिक्षणार्थींना वाटते.
5) शालेय आंतरवासितेसाठी निवडलेल्या शाळा सर्वच प्रशिक्षणार्थींना योग्य वाटतात.
6) महाविद्यालय व आंतरवासितेसाठी निवडलेल्या शाळा यामधील अंतर 45% प्रशिक्षणार्थींना योग्य वाटते तर 55% प्रशिक्षणार्थींना हे अंतर 5 ते 10 किमी इतके असावे असे वाटते.

7) अभ्यासक्रमात वर्गाध्यपन किंवा सराव पाठ यामध्ये दिलेल्या विविध पाठांची संख्या शिक्षक प्रशिक्षणार्थींना योग्य वाटते.

8) विविध सरावपाठांपैकी संगणकाधारिता पाठ घेण्यामध्ये बहुतांश प्रशिक्षणार्थींनां अडचणी आल्या त्या अडचणींमध्ये शाळेत संगणक व एलसीडी सुविधांचा अभाव विद्युत बॅक अपचीत इंटरनेटची सोय नसणे व संगणक कक्षाचा अपुरा आकार या अडचणींचा प्रामुख्याने समावेश आहे.

9) सरावपाठ व्यतिरिक्तचे इतर पाठ घेणे यामध्ये 15% प्रशिक्षणार्थींना अडचणी आल्या, इतर पाठांमध्ये मार्गदर्शन पर पाठ घेण्याचे प्रमाण जास्त दिसून येते, तर कार्यानुभवाचे पाठ घणे यामध्ये प्रशिक्षणार्थींना अडचण वाटते.

10) सराव पाठांची निरीक्षणे करताना प्रामुख्याने प्रशिक्षणर्थींना स्वतःच्या मेथडच्या प्रशिक्षणार्थींचे गटातील अपुरी संख्या ही अडचण वाटली.

11) प्रशिक्षणार्थींना एकंदर कामाची जबाबदारी पार पाडताना प्रथम काय करावे? याविषयीचे समस्या बहुतांश प्रशिक्षणार्थींना जाणवली.

12) दैनंदिन परिपाठामध्ये समुहगीताचा समावेश असावा असे 72.45% प्रशिक्षणार्थींना वाटते.

13) दिनदर्शिका तयार करताना त्याचा नमुना पहावयास हवा होता असे बहुतांश प्रशिक्षणार्थींना वाटते.

14) घटक चाचणी घेणे व निकालपत्रक तयार करणे यामध्ये प्रशिक्षणार्थींना कोणतीही अडचण आली नाही. तसेच दैनिक टाचण वही लिहतानाही कोणतीही अडचण आली नाही.

15) सहशालेय उपक्रम नियोजन व आयोजन करताना बहुतांश प्रशिक्ष्णार्थींना अडचणी आल्या नाहीत मात्र काही प्रशिक्षणार्थींना सभागृहाची कमतरता जागवली.

16) शालाबाह्य शिक्षण उपक्रम नियोजन व आयोजन करताना सर्वच प्रशिक्षणार्थींनी वाचनालय भेट, ग्रामपाहणी यासाठी ग्रंथपाल, ग्रामसेवक यांच्या वेळा मिळणे व भेट मिळणे यामध्ये चालढकल झाल्याचे नमूद केले आहे.

17) व्यक्ती अभ्यास करताना बहुतांश प्रशिक्षणार्थींना कोणते प्रश्न संबंधित विद्यार्थ्याला विचारावेत ही समस्या आली.

18) सामाजिक वृद्धी कार्यक्रम राबवताना बहुतांश प्रशिक्षणार्थींना अडचणी आल्या नाहीत.

19) कृती संशोधन करताना बहुतांश प्रशिक्षणार्थींना प्रायोगिक कृतींची अमलबजावणी करणे यामध्ये अडचणी आल्या.

20) मानसशास्त्रीय चाचणीचे प्रशासन करताना चाचणी ही हिंदीमध्ये होती त्याचा अर्थ शालेय विद्यार्थ्यांना समजण्यामध्ये अडचणी वाटली असे सर्वच प्रशिक्षणार्थींचे मत आहे.

